महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

**( महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय भाग ६ अ करिता )**

क्र: पोमसं /८अ/पदोन्नती-मुफसल/का.अ.निवडसुची/२०२२-२३/१५५/२०२२ मुंबई , दि. २४/०४/२०२३

**-:आदेश:-**

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मुफसल लिपीक संवर्गातील खालील नमूद प्रमुख लिपिक यांना कार्यालय अधीक्षक (राजपत्रित / अराजपत्रित गट ब या पदावर कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत असून पदोन्नतीवर त्यांची पदस्थापना त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या कार्यालयामध्ये करण्यात येत आहे :-

| अ.क्र | प्रमुख लिपिकांची नावे | सध्याच्या नियुक्तीचे कार्यालय | पदोन्नतीवरील नेमणुकीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | श्री.विजय बबन घुले | अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे | पोलीस उपमहानिरीक्षक,राज्य राखीव पोलीस बल, पुणे |
| २. | श्रीमती विजया संभाजी कांबळे | विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र, नवी मुंबई | समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१९, कुसडगाव, अहमदनगर |
| ३. | श्री.रहमत खाँ लालखाँ पठाण | विशेष पोलीस महानिरीक्षक, नांदेड परिक्षेत्र, नांदेड | समादेशक, राज्य राखीव पोलीस बल , गट क्र.१३, विसोरा, ता. वडसा (देसाईगंज) गडचिरोली |
| ४. | श्रीमती रेखा रमेश पवार | पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे | विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर |
| ५. | श्री.सुहास प्रभाकर मुंडे | समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१४ औरंगाबाद | विशेष पोलीस महानिरीक्षक, औरंगाबाद परिक्षेत्र, औरंगाबाद |
| ६. | श्री.योगेश पर्वत शिंदे | विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र, नाशिक | समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ६, धुळे |

१. उपरोक्त पदोन्नती ही विशेष अनुमती याचिका क्रमांक २८३०६/२०१७ या प्रकरणात मा.सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णय व आदेश यांच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

२. उपरोक्त पदोन्नती ही शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६ब, दि.०७/०५/२०२१ यास आव्हान देण्यात आलेल्या प्रकरणात मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयाच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

३. उपरोक्त पदोन्नती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने या तात्पुरत्या पदोन्नतीमुळे संबंधित अधिकारी यांना नियमाधिनतेचा (regularization) व सेवाजेष्ठतेच्या (seniority) कोणताही हक्क असणार नाही.

**रजनिश सेठ**
पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई .

प्रति,

अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे.
विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र, नवी मुंबई/ नाशिक परिक्षेत्र, नाशिक /नांदेड परिक्षेत्र, नांदेड/औरंगाबाद परिक्षेत्र, औरंगाबाद/ कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर.
पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे
समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१४, औरंगाबाद

२. उपरोक्त नमुद प्रमुख लिपिक यांना आता निलंबित केले असेल, किंवा त्यांच्याविरुध्द नव्याने विभागीय चौकशी प्रलंबित असेल, किंवा न्यायालयात खटला चालू असेल, किंवा न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविरुध्द वरिष्ठ न्यायालयात अपिल प्रलंबित असेल, किंवा जर ते एखादी शिक्षा भोगत असतील व ती शिक्षा या निवडसूची वर्ष सन २०२२-२३ मध्ये संपुष्टात आली नसेल तर पदोन्नतीवर न सोडता सविस्तर अहवाल पोलीस महासंचालक कार्यालयास पाठवावा व पुढील आदेशांची वाट पाहावी.

३.	उपरोक्त नमुद प्रमुख लिपिक यांचेविरुध्द  काहीच कार्यवाही प्रलंबित नसेल तर त्यांना **पर्यायी कार्यालय अधीक्षकांची वाट न पाहता** पदोन्नतीवर नवीन नियुक्तीचे ठिकाणी तात्काळ कार्यमुक्त करावे. तसेच त्यांना  कार्यमुक्त केल्याचा व पदोन्नतीच्या ठिकाणी हजर  झाल्याचा दिनांक  सत्वर ह्या  कार्यालयास कळवावा.

४.	घटक प्रमुखांनी संबंधित  प्रमुख लिपिक यांना विनाविलंब  कार्यमुक्त न केल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित घटक प्रमुखांची राहील.

५.	शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक पीएचवाय् /१०८२/सीआर/११००(२)/सेवा-३, दिनांक ०६.११.१९८४ अन्वये पदोन्नतीनंतर  कनिष्ठ पदावर वेतनवाढ दिल्यानंतर वेतननिश्चिती  याबाबत विकल्प द्यावयाचा असेल, तर तो पदोन्नतीवर हजर झालेल्या दिनांकापासून १ महिन्याचे आंत द्यावा. अशा प्रकारचा विकल्प न दिल्यास पदोन्नत पदावरील वेतननिश्चिती म.ना.सेवा (वेतन) नियम, ११(१)(अ) अन्वये केली जाईल याची उपरोक्त  प्रमुख लिपिक यांनी नोंद घ्यावी.

६.	उपरोक्त नमुद प्रमुख लिपिक हे पदोन्नतीवर जाण्यास इच्छुक नसतील तर त्यांनी तसा **अर्ज ७ दिवसांचे आत** घटक प्रमुखांचे मार्फत ह्या  कार्यालयास सादर करावा.

७.	पदोन्नत झालेल्या सर्व प्रमुख लिपिक यांचे हार्दिक अभिनंदन.

प्रत:-

पोलीस उप महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे
समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ५ दौंड / गट क्र. ६ धुळे / गट क्र.१३ वडसा (देसाईगंज), गडचिरोली / गट क्र.१९ कुसडगाव,अहमदनगर

२.	नमुद घटक प्रमुख यांनी पदोन्नत झालेले प्रमुख लिपिक हे पदोन्नतीवर हजर झाल्याचा दिनांक या कार्यालयास कळवावा.

प्रत,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म. राज्य, मुंबई (सस्नेह सादर)
अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, म.रा., मुंबई.
पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष.
२. सदरचे आदेश कृपया पोलीस महासंचालकांच्या संकेतस्थळावर एक महिन्यासाठी उपलब्ध करुन देण्यात यावेत.
कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक	१० / १२ / ३६

(अनुप कुमार सिंह )
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचे करीता.